आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

४ ऑगस्ट २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- सरकारी योजनांचे फायदे तळागाळातल्या नागरिकांपर्यंत पोहोचावेत, याकरता राज्यपालांनी पुढाकार घ्यावा असं राष्ट्रपतींचं राज्यपाल परिषदेत आवाहन.

- कृषी अर्थतज्ज्ञांच्या ३२व्या आंतरराष्ट्रीय परिषदेत परदेशी प्रतिनिधींकडून भारतातल्या कृषी क्षमतेची आणि कृषीक्षेत्रातल्या एकंदर यशोगाथेची प्रशंसा

- अवयव प्रत्यारोपणासाठी मानवी अवयव हवाई मार्ग, रेल्वेमार्ग किंवा रस्त्याने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासंदर्भात केंद्रसरकारने जारी केली कार्यपद्धती

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज बॅडमिंटनच्या उपांत्य फेरीत भारताच्या लक्ष्य सेनची लढत डेन्मार्कच्या व्हिक्टर ॲक्सेलसेन बरोबर होणार

- देशात विविध ठिकाणी पावसाचा प्रकोप/ वायनाडमधे अद्याप बचावकार्य सुरु

**आणि**

- ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या शोभना रानडे यांचं आज सकाळी पुण्यात निधन

<><><><><>

राज्यपालांच्या दोन दिवसीय परिषदेचा काल राष्ट्रपती भवनात समारोप झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी एकमेकांच्या अनुभवातून शिकण्याच्या भावनेनं सर्वसमावेशक चर्चा करण्याच्या राज्यपालांच्या प्रयत्नांचं कौतुक केलं. सरकारी योजनांचे फायदे तळागाळातल्या नागरिकांपर्यंत पोहोचावेत, विशेषतः अनुसूचित जाती-जमाती आणि आदिवासींना या योजनांचा लाभ मिळावा याकरता राज्यपालांनी पुढाकार घ्यावा असं त्यांनी आपल्या समारोपाच्या भाषणात

सांगितलं. आदर्श राज्याचा वस्तुपाठ प्रस्थापित करणं ही राज्यपालांची जबाबदारी असून प्रभावी कामकाजासाठी राज्यपालांनी संबंधित राज्य सरकारांशी सतत संवाद साधावा असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी यावेळी सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राज्यपालांना राजभवनात शासनाचं आदर्श मॉडेल विकसित करण्याचं आवाहन केलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा देखील परिषदेला उपस्थित होते.

<><><><>

नवी दिल्ली इथं आयोजित कृषी अर्थतज्ज्ञांच्या३२व्या आंतरराष्ट्रीय परिषदेत उपस्थित असलेल्या परदेशी प्रतिनिधींनी भारतातल्या कृषी क्षमतेची आणि कृषीक्षेत्रातल्या एकंदर यशोगाथेची प्रशंसा केली आहे. या सहा दिवसीय परिषदेला ७५ देशांमधले कृषी अर्थतज्ञ उपस्थित असून त्यांनी भारताच्या कृषिक्षेत्रातल्या कामगिरीचं आणि संशोधनाचं कौतुक केले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल या परिषदेचं उदघाटन झालं. भारत अनेक कृषी उत्पादनांमधला अग्रणी उत्पादक आहे, भारताची वैविध्यपूर्ण जैवसंस्था आणि कृषी शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा यांनी कृषी क्षेत्रातल्या भारताच्या प्रगतीमध्ये महत्वाचं योगदान दिलं आहे, असं बांगलादेशच्या प्रतिनिधींनी म्हटलं आहे. तर भारत कृषिक्षेत्रात झपाट्यानं प्रगती करत असून त्यादृष्टीनं होणारं संशोधन उल्लेखनीय आहे, असं केनियानं म्हटलं आहे. शेतीमधल्या पारंपारिक पद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यासाठी भारत आणि इतर देशांमध्ये असलेलं सहकार्य महत्त्वपूर्ण असल्याचं मत जपानच्या प्रतिनिधीनं व्यक्त केलं आहे.

<><><><>

अवयव प्रत्यारोपणासाठी मानवी अवयव हवाई मार्ग, रेल्वेमार्ग किंवा रस्त्याने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठीची कार्यपद्धती केंद्रीय अर्थमंत्रालयानं जारी केली आहे. मानवी अवयवांचा पूर्ण उपयोग करून घेणं आणि त्यांची गरज असलेल्या रुग्णांसाठी हे अवयव उपलब्ध करून देणं हा या कार्यपद्धतीचा उद्देश असल्याचं आरोग्य सचिव अपूर्व चंद्रा यांनी म्हटलं आहे. अवयव देणारा आणि घेणारा हे दोन रुग्ण जेव्हा वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये असतात, तेव्हा हे अवयव एका ठिकाणाहून दुसरीकडे न्यावे लागतात. यासाठीची प्रक्रिया या कार्यपद्धतीमुळे सुलभ होणार आहे. नीती आयोग, संबंधित मंत्रालयं आणि या क्षेत्रातल्या तज्ञांशी चर्चा करून ही कार्यपद्धती तयार करण्यात आली आहे.

<><><><><>

अन्य राज्यातून बी ए एम एस केलेल्या महाराष्ट्रातल्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर आयुर्वेदिक शिक्षणासाठी राज्याच्या कोट्यातून प्रवेश देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. मुंबईत काल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी वैद्यकीय शिक्षण प्रधान सचिव दिनेश वाघमारे यांना पदव्युत्तर प्रवेश नियमांत आवश्यक ते बदल करून मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश दिले. या विद्यार्थ्यांना आता राज्याच्या शासकीय आणि खाजगी अनुदानित ८५ टक्के तसंच खाजगी विना अनुदानित ७०टक्के कोट्यातून प्रवेश घेता येणार आहे.

<><><><><>

न्यायव्यवस्थेला पूरक ठरणाऱ्या विविध सेवांचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज चंडीगढ इथं होणार आहे. फौजदारी कारवाईअंतर्गत

इलेक्ट्रॉनिक स्वरुपातले पुरावे हाताळण्यासाठी न्याय सेतू, न्याय श्रुती आणि ई – समन्स या यंत्रणा उपलब्ध करु देण्यात येणार आहेत.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज बॅडमिंटनच्या उपांत्य फेरीत भारताच्या लक्ष्य सेनसमोर टोक्यो ऑलिम्पिकचा सुवर्णपदक विजेता डेन्मार्कचा व्हिक्टर ॲक्सेलसेन याचं आव्हान असेल. भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी साडेतीन वाजता हा सामना सुरू होईल. लक्ष्य सेननं विजय मिळवला, तर त्याचं पदक निश्चित होईल. दुसरीकडे महिलांच्या मुष्टियुद्ध स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत ७५ किलो वजनी गटात टोक्यो ऑलिम्पिकची पदकविजेती मुष्टियोद्धा लोव्हलीना बोर्गोहाइन हिचा सामना आज चीनच्या ली क्वियान हिच्याशी होईल. तर पुरुषांच्या हॉकी संघाची उपांत्यपूर्व फेरीची लढत ग्रेट ब्रिटनसोबत होईल. नेमबाजीत २५ मीटर जलद फायर पिस्तूल प्रकाराच्या पात्रता फेरीत अनीश भनवाला आणि विजयवीर सिद्धू लक्ष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न करतील. महिलांच्या ३ हजार मीटर अडथळ्यांच्या शर्यतीच्या पहिल्या फेरीत पारूल चौधरी सहभागी होईल. पुरुषांच्या लांब उडी स्पर्धेत जेस्विन आल्ड्रिन मैदानात उतरेल.

<><><><><>

हिजबुल्लाह या लेबनॉन मध्ये सक्रिय असलेल्या दहशतवादी गटानं काल रात्री इस्राएलमधल्या बीट हिलेल शहरावर हल्ला केला. हिजबुल्लाह गटाला इराणचं पाठबळ असून पॅलेस्टाइनी नागरिकांच्या विरुद्ध इस्राइलनं केलेल्या हल्ल्याला तसंच इस्राइलनं केफर केला आणि देर सिरियान या लेबनीज शहरांवर केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून हे पाऊल उचलल्याचं हिजबुल्लाह गटाचं म्हणणं आहे.

**<><><><><>**

इस्राइल आणि हिजबुल्लाह यांच्यातल्या तीव्र संघर्षाच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून अमेरिका आणि इंग्लडनं लेबनॉन मधल्या आपल्या नागरिकांना तिथून तातडीनं बाहेर पडण्याची सूचना केली आहे.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागानं आज मध्य महाराष्ट्र, कोकण आणि गोव्यातल्या घाट भागात अतिवृष्टीची शक्यता वर्तवली आहे. तसंच पश्चिम मध्य प्रदेश आणि पूर्व राजस्थानमध्ये अत्यंत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. नैऋत्य राजस्थान आणि त्याच्या आजूबाजूच्या परिसरात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे हा मुसळधार पाऊस अपेक्षित असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. दक्षिण भारतात, आज कर्नाटकच्या किनारपट्टीच्या भागातही अतिमुसळधार पावसाची स्थिती असेल आणि उद्यापर्यंत केरळ, माहे आणि तामिळनाडूमध्ये मुसळधार पावसाची स्थिती असेल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. दरम्यान, सुंदरबनच्या परिसरातल्या नद्या ओसंडून वाहत असल्यानं ब्लॉक आणि उपविभाग स्तरावर नियंत्रण कक्ष उघडण्यात आला आहे. महाराष्ट्रातही सर्वदूर पाऊस होत असून उद्यापर्यंत पुणे आणि सातारा जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**<><><><><>**

केरळमध्ये वायनाड जिल्ह्यात भूस्खलनग्रस्त भागात बचावकार्याचा आज सहावा दिवस आहे. शोधकार्यात काल १६ मानवी अवशेष हाती लागले. सशस्त्र दलाचे साडे बाराशेपेक्षा जास्त कर्मचारी बाधित भागात मदत आणि आपत्ती

निवारण कार्यात सहभागी झाले आहेत. दुर्घटना झालेल्या ठिकाणी पर्यटनाला न जाण्याचं आवाहन राज्यसरकारने केलं आहे. मृतांचा शोध अंतिम टप्प्यात आल्यानं, आता विविध मदत छावण्यांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या पुनर्वसनाकडं लक्ष केंद्रित केलं जात आहे. भूस्खलनातून वाचवलेल्याचं सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन केलं जाईल आणि त्यांच्यासाठी नवीन वसाहत बांधली जाईल असं मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी सांगितलं. दहा हजारापेक्षा जास्त आपद्ग्रस्तांनी विविध मदत शिबिरांमध्ये आसरा घेतला आहे. बाधित प्रदेशातल्या मुलांच्या मानसिक आरोग्य आणि उपचारांसाठी राज्याच्या आरोग्य विभागानं १३७ समुपदेशक तैनात केले आहेत.

**<><><><><>**

हिमाचल प्रदेशच्या काही भागात मुसळधार पाऊस सुरु आहे. गेल्या ३७ दिवसांत ढग फुटी, पूर आणि भूस्खनाच्या एकूण ४७ घटना घडल्या आहेत. राज्यात २२ ठिकाणी अचानक आलेल्या पुरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. १७ ठिकाणी भूस्खलनाच्या घटना तर ८ ठिकाणी ढगफुटीच्या घटना घडल्या आहेत. या सर्व घटनांत १० जणांचा मृत्यू, ४ जण जखमी तर ४६ जण बेपत्ता झाले आहेत.

सिमला, मंडी आणि कुल्लू जिल्ह्यांतल्या बेपत्ता लोकांचा आज चौथ्या दिवशीही शोध सुरु आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या शोभना रानडे यांचं आज सकाळी पुण्यात निधन झालं. त्या १०० वर्षांच्या होत्या. शोभना रानडे यांनी निराधार महिला आणि

मुलांसाठी समाजकार्य केलं. भारत सरकारनं २०११ मध्ये त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन सन्मानित केलं होतं.

पुण्यात आगा खान पॅलेस इथं गांधी नॅशनल मेमोरियल सोसायटी आणि प्रशिक्षणासाठी महिलांकरिता एक संस्था स्थापन करण्यात त्यांनी मदत केली. बालग्राम महाराष्ट्र नावानं एक मुलांचं गाव त्यांनी सुरू केलं त्याद्वारे शेकडो अनाथ मुलांना आसरा मिळाला. गांधी नॅशनल मेमोरियल सोसायटीच्या माध्यमातून गंगा वाचवा चळवळीत शोभना रानडे यांचा सक्रिय सहभाग होता.

**//<><><><><>//**